महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.३४८/२४८६२
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in
दिनांक : ११.१०.२०१७

# परिपत्रक

**विषय :** माजी राष्ट्रपती स्व.डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करणेबाबत.

**संदर्भ :** शासन परिपत्रक क्र. वाप्रेदि-२०१७/प्र.क्र.९३/२०१७/भाषा-३ दि. ०३ ऑक्टोबर २०१७.

----

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना शासन परिपत्रक क्र. वाप्रेदि-२०१७/प्र.क्र.९३/२०१७/भाषा-३ दिनांक ०३ ऑक्टोबर २०१७ अन्वये दिनांक १५ ऑक्टोबर हा दिवस माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्याबाबतच्या सूचना पारित करण्यात आलेल्या आहेत. सोबत दिनांक ०३.१०.२०१७ च्या संदर्भिय शासन परिपत्रकाची प्रत माहितीस्तव जोडण्यात येत आहे.

२. सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना विनंती करण्यात येते की, शासन परिपत्रक दिनांक ०३.१०.२०१७ मधील सूचनांचे अवलोकन करुन दिनांक १५ ऑक्टोबर हा दिवस माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून दरवर्षी साजरा करण्यात यावा. तसेच दि. १५.१०.२०१७ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने हा कार्यक्रम दि. १३.१०.२०१७ रोजी साजरा करण्यात यावा.

३. सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

( संदेश हाके )
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक - वाप्रेदि-२०१७/प्र.क्र.९३/२०१७/भाषा-३,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**तारीख: ०३ ऑक्टोबर, २०१७.**

**संदर्भ :-** मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्र.वाप्रेदि-२०१५/प्र.क्र.८९/२०१५/भाषा-३, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५.

**शासन परिपत्रक :-**

माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दिनांक १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयास अनुसरुन शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने यापूर्वी संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे या वर्षी सुध्दा वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय /निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था / मंडळ, सार्वजनिक उपक्रम इ. कार्यालयांनी देखील विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. दिनांक १५ ऑक्टोबर, रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी शासकीय / निमशासकीय कार्यालये, शाळा यांनी कार्यक्रमांचे आयोजन करावे. प्रत्येक अधिकारी / कर्मचारी तसेच शालेय विद्यार्थी, शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी कामकाजाच्या वेळेमध्ये किमान अर्धा तास वाचनासाठी द्यावा. वाचनाकरीता समुहाने एकत्रितपणे बसून, आपला वेळ वाचनासाठी व्यतित करावा.
२. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी आपले मित्र, कुटुंबातील सदस्य इत्यादींना किमान एक पुस्तक भेट द्यावे.
३. WhatsApp, Internet, Facebook, Twitter अशा प्रकारच्या सामाजिक प्रसार माध्यमातून वाचन संस्कृती वृध्दींगत होईल /वाचनास प्रेरणा मिळेल असे संदेश प्रसारीत करावेत.
४. चालू वर्ष हे ख्यातनाम कवी विंदा करंदीकर यांचे जन्म शताब्दी वर्ष आहे. त्या अनुषंगाने कवी संमेलन / व्याख्यान / भाषण / चर्चासत्र / सामुहिक वाचन / अभिवाचन / वाचन अनुभव कथन / ग्रंथप्रदर्शन / विविध स्पर्धा इ. पैकी सुयोग्य उपक्रम राबवावेत.

५. विविध क्षेत्रातील सुप्रसिध्द व्यक्ती, साहित्यिक संस्था, सार्वजनिक ग्रंथालये यांचे सहकार्य घेऊन सामुदायिकरित्या पुस्तक वाचनाचे कार्यक्रम आयोजित करावे.

६. "पुस्तकांचे गांव" (भिलार, ता.महाबळेश्वर, जि.सातारा) या शासनाच्या अभिनव प्रकल्पाची माहिती घेण्यात यावी. शक्य असल्यास या प्रकल्पास भेट द्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७०९१९११४८२५०१३३ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( अपर्णा अ. गावडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री (मराठी भाषा) यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
४. मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव
६. मा.मुख्य सचिव / सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई (पत्राने),
८. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई (पत्राने),
९. प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१०. सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ, विधान भवन, मुंबई,
११. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१२. सर्व मंत्रालयीन विभाग,
१३. सर्व विभागीय आयुक्त,
१४. सर्व जिल्हाधिकारी,
१५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१६. महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई,
१७. महालेखापाल -२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), नागपूर,
१८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२०. भाषा संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२१. संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
२२. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२३. सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
२४. निवड नस्ती / भाषा -३.